# "ब्लू प्रिंट ऑफ प्रोग्रामिंग लॉजिक"

मू.जे.महाविद्यालयातील संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान विभागातर्फे "ब्लू प्रिंट ऑफ प्रोग्रामिंग लॉजिक" विषयी एकदिवसीय कार्यशाळा शुक्रवार दि. ७ रोजी घेण्यात आली. कार्यशाळेत संगणकातील प्रोग्रामसंबंधी विविध उपविषय घेऊन माहिती देण्यात आली.



विचारमंचावर प्राचार्य डॉ.उदय कुलकर्णी, विज्ञान विद्याशाखेचे समन्वयक प्रा.जे.एन.चौधरी, विभागप्रमुख प्रा.हेमलता पाटील उपस्थित होते. उद्घाटन प्राचार्य डॉ.कुलकर्णी यांचे हस्ते झाले. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन प्रा.उज्ज्वला महाजन यांनी तर आभार प्रा.गीता जावळे यांनी केले. यावेळी प्राध्यापक, विभागातील विद्यार्थी उपस्थित होते.

**कार्यशाळेतील मार्गदर्शन**

प्रा.स्वप्नाली वाघुळदे यांनी प्रोगामिंग मधील आज्ञावली विषयी माहिती देत ती कशी तयार करावी, त्यातील बारकावे शास्त्रीय पद्धतीने विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.




प्रा.लीना भोळे यांनी "लो चार्ट" या विषयावर संवाद साधतांना संगणकशास्त्रातील विविध शैलींची माहिती देत प्रोगामिंगची कार्यपद्धती विशद केली. कवियित्री बहिणाबाई चौधरी विद्यापीठाचे संगणकशास्त्र प्रशाळा येथील प्रा.डॉ. अजय पाटील यांनी "प्रोगामिंग कौशल्य" या विषयावर माहिती देताना म्हटले की, संगणकशास्त्रात प्रोग्रामिंगचे अनन्य साधारण महत्व असून छोट्या छोट्या बाबींचा अभ्यास केला तर या विषयात कौशल्यपूर्ण होता येते.

